# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## गुरुवार, दिनांक १९ जुलै, २०१२

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(अ) तारांकित प्रश्न.**

**(ब) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : **"आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात विंधन विहीरी कार्यक्रमांतर्गत १२ ठिकाणी विंधन विहीरी देण्याबाबत करावयाची कार्यवाही"** या विषयावरील श्री.भगवान साळुंखे, डॉ.रणजित पाटील, श्री.नागो गाणार, श्री.रामनाथ मोते, श्री.चंद्रकात पाटील, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक २५०४९ ला दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : (अ) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना - असल्यास.**

**(ब) म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - असल्यास.**

**तीन : लक्षवेधी सूचना- (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री हेमंत टकले, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेकडून कांजूरमार्ग (पूर्व) येथे सुरु करण्यात आलेल्या क्षेपणभूमीमध्ये सर्व नियमांचे उल्लंघन करुन टाकलेल्या कचऱ्यामुळे विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप, नाहूर, पवई व घाटकोपर तसेच, सन १९६६ साली निर्माण झालेली माजी मुख्यमंत्री कै.दादासाहेब कन्नमवार यांच्या नावाने आशिया खंडातील सर्वात मोठी असलेली म्हाडा वसाहत - कन्नमवार नगर येथे पसरलेली दुर्गंधी व रोगराई, नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, क्षेपणभूमी काम सुरु असताना कांदळवनाची झालेली कत्तल, तसेच लाखो मासे, विविध किटक व परदेशातून येणारे फ्लेमिंगो सारखे पक्षी यांच्या अस्तित्वाचा निर्माण झालेला प्रश्न, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, सदरचा भूखंड हा झोपडपट्टी पुनर्वसन योजने

अंतर्गत घरे बांधण्यासाठी राखीव असतांना सदर भूखंड क्षेपणभूमीसाठी चुकीच्या पध्दतीने वापरणे, त्यामुळे मुंबई शहरात रहात असलेल्या ५५ % झोपडपट्टीवासियांच्या घरांचा निर्माण झालेला प्रश्न, नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

(२) **श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे येथील धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात पुणे महानगरपालिकेने एकवेळ कपात सुरु करणे, जून महिना व जुलै महिन्यातील १५ दिवस उलटूनही पुण्यात व धरण क्षेत्रात पावसाने दडी मारल्याने पुण्यातील पाणीसमस्या चिंताजनक असणे, पाणी टंचाईच्या वेळी अनेक पुणेकरांना पाणी विकत घेण्याची वेळ येणे, पाणी पुरविण्यात काळा बाजारा होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांकडून उपस्थित होणे, झपाट्याने वाढणाऱ्या पुणे शहरात पाणीसमस्येवर कायमस्वरुपी उपाययोजना न केल्यास शहराला भविष्यात गंभीर प्रश्नाला सामोरे जावे लागण्याची शक्यता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(३) **श्री. परशुराम उपरकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दोडामार्ग, ता.सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग येथे परप्रांतीय केरळीयन लोकांकडून मोठ्या प्रमाणात झालेली जमीन खरेदी, जमीन खरेदी करतेवेळी केरळीयन भाषेत असलेल्या "शेतकरी असल्याच्या" दाखल्यांचे भाषांतर करुन खोटे दाखले सादर करणे, या केरळीयन लोकांनी गुन्हेगारी प्रवृत्तीने लगतच्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करुन कब्जा करणे, अशा तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होणे, सबरजिस्ट्रार कार्यालयाकडून या केरळीयन लोकांकडून वारेमाप पैसे घेऊन जमिनीचे खरेदी व्यवहार करण्यास मदत करणे, अशा प्रकारे सावंतवाडी तालुक्यातील केसरी सर्व्हे नं.८८ हिस्सा नं.० प्रद्युम्न वासुदेव दाभोळकर यांच्या मालकीची कुळकायद्याची जमीन "४३- ग" ची परवानगी न घेता परस्पर खरेदी करण्याचा प्रकार उघड होणे, या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. जयंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यात रासायनिक कारखाने, खत कारखाने, तेल शुध्दीकरण, औष्णीक

ऊर्जा निर्मिती, रंग निर्मिती तथा डायकेमिकल्स कारखाने गेल्या दोन दशकांपासून कार्यरत असणे, सदरील कारखाने केंद्रीय प्रदुषण मंडळाने रेडझोनमध्ये समाविष्ट करणे, या उद्योगातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होवून कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या दुषित पाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता ते थेट नदी नाल्यामध्ये व खाडीमध्ये सोडण्यात येणे, परिणामी परिसरातील शेत जमीन, बागायती इत्यादींवर विपरीत परिणाम होवून हजारो हेक्टर शेत जमीन नापीक होण्याच्या मार्गावर असणे, उत्पन्नातही मोठ्या प्रमाणावर घट निर्माण होणे, तसेच भविष्यात नागरिकांच्या आरोग्यावरही विपरित परिणाम होण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

**चार : विशेष उल्लेख सूचना - असल्यास -**

**<u>दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर</u>**

## (दुपारी २.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत)

**पाच : <u>मा.समिती प्रमुख, विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव-</u>**

"विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,-

(१) श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायाच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तीमुळे बहूजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

(२) श्री.पुरुषोत्तम खेडेकर लिखित "महाराज, माफ करा..!!" या पुस्तकातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम १७८ (१) च्या परंतुकान्वये, पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी."

**सहा : शासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ - विचार, खंडश: विचार व समंत करणे -**

(१) सन २०१२ चे वि.प.वि. क्रमांक १० - मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१२.

(२) सन २०१२ चे वि.प.वि. क्रमांक ११ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगर परिषदा (सुधारणा) विधेयक, २०१२.

सात : **(बुधवार, दिनांक १८ जुलै, २०१२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला प्रस्ताव)-**

**डॉ. सुधीर तांबे,** सर्वश्री. हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, विजयसिंह मोहिते-पाटील, मोहन जोशी, अरुण गुजराथी, सुरेश नवले, दिपकराव साळुंखे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री.राजन तेली, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेस मंत्री महोदयांचे उत्तर - पुढे सुरू.**

"रस्ते अपघातांचे दिवसेंदिवस वाढत असलेले चिंताजनक प्रमाण वाढती वाहतूक, अपुरे व अरुंद रस्ते, बेकायदेशीर वाहतूक, बेशिस्त, अप्रशिक्षित व बेजबाबदार वाहनचालक, अकार्यक्षम वाहतूक नियंत्रण व्यवस्था, यासारख्या प्रश्नांमुळे अपघातांमुळे मृत्यू पावणारांची संख्या आज हृदयरोग व अन्य कुठल्याही आजारांमुळे मृत्यु पावणाऱ्यांपेक्षा खूप अधिक आहे. वाहनांचा वाढलेला वेग, यामुळे अतिशय भीषण अपघात सतत होत असतात. परिणामी मृत्यू वा जीवघेण्या जखमा यांचे प्रमाण खूप अधिक असणे, या गंभीररित्या जखमींवर उपचार करण्यासाठी असलेल्या ट्रॉमा सेंटर्स व ॲम्ब्युलन्स व्यवस्था अपुरी व तोकडी असणे, या अपघातांमध्ये बळी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी असणे, तरुण व्यक्ती बळी पडल्यामुळे कुटुंब निराधार होऊन उध्वस्त होणे, या अपघातात बळी पडलेल्यांना "अपघात विमा" च्या सुविधा योग्यरितीने उपलब्ध नसणे, रस्ते अपघाताचा हा प्रश्न अतिशय महत्वाचा असल्याने यावर त्वरीत उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती नेमणे आवश्यक असून या सर्व समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शासनाने करावयाची ठोस उपाययोजना याबाबत शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

आठ : **म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

**सर्वश्री विनोद तावडे,** दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दिपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, पाशा पटेल, डॉ.रणजीत पाटील श्री. नागो गाणार**, वि.प.स. यांचा प्रस्ताव -**

"विविध प्राणी, वनस्पती, मानव, हवा व सुर्यप्रकाश इत्यादी मिळून आपल्या सभोवतालचे पर्यावरण निर्माण होणे, पर्यावरणाचे संतुलन बिघडू नये याकरिता पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करण्यात येणे, परंतू शासनाच्या पर्यावरण मंत्रालयास पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास अपयश येणे, शासनास आलेल्या अपयशामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढणे, पर्यावरणातील प्रदूषण वाढण्यामागे विविध बाबी जसे की कळणे, जिल्हा सिंधुदूर्ग, भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, येथील अवैध उत्खनन कारणीभूत असणे, अनिर्बंध वाळू उत्खननामुळे

भुगर्भातील जलसाठ्यांसह (समुद्र) वर दुष्परिणाम होणे, पश्चिम घाटाला युनेस्कोने जागतीक वारशाचा दर्जा देण्याचे घोषीत केले असताना व गाडगीळ समितीने देखील पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित केलेले असताना, महाराष्ट्र शासनाने मुळशी तालुक्यात ३ गिरीस्थाने तत्वतः मंजूर करणे, तसेच विविध उद्योगधंदे, साखर कारखाने तसेच महापालिकांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाणी व मलमुत्र प्रक्रिया न करता सोडल्यामुळे नद्यांचे प्रदूषणात वाढ होणे, ई-कचरा तसेच रुग्णालयातून बाहेर पडणाऱ्या जैविक कचऱ्याच्या गंभीर समस्येवर आवश्यक त्या उपाययोजना करण्यास शासनास अपयश येणे, राज्यातील पर्यावरणाच्या नियमांचे उघडपणे उल्लंघन होत असतांना अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक तयार करण्याबाबत व शिवाजी पार्क मैदान सभांसाठी नेत्यांना उपलब्ध करण्याबाबतच्या प्रश्नाकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, पर्यावरणाच्या संतूलनात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या तिवरांची अपरिमीत हानी करण्यात येणे, निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे तापमानातील वाढ तसेच "एल निनो" व "ला निनो" या समस्यांना सामोरे जावे लागून सतत अवर्षण अथवा अतिवृष्टीचा सामना करावा लागणे, प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणातील ओझोनचे प्रमाण कमी होऊन मानवी शरिरावर त्याचा दुष्परिणाम होणे, यातून मार्ग काढण्यासाठी भविष्यातील आव्हानांचा विचार करिता शाश्वतविकास होईल अशा रितीने उद्योगधंद्यांची वाढ करीत पुढील पिढीचे आयुष्य सुखकर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेत शासनास आलेले अपयश व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप -**

**दहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"प्राथमिक शाळांमध्ये ५०० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असल्यास १ लिपिक व १ सेवक पद मंजूर होणे, शासनाने राज्यातील १९३ लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पदांना मान्यता देणे, वर्षानुवर्षे शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणून सेवा करणे, राज्यातील काही प्राथमिक शाळांमध्ये संख्या कमी झाल्याने लिपिक व कर्मचारी अतिरिक्त ठरणे, अतिरिक्त शिक्षकेत्तरांचे समायोजन करण्याच्या कारणास्तव वाढीव पदांवर काम करणाऱ्या लिपिकांना व सेवकांची मान्यता नाकारणे, इंग्रजी माध्यम वगळून अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या कमी होणे व परिणामतः शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त होत असल्याने विद्यार्थी संख्येच्या निकषात बदल करण्याची आवश्यकता, माध्यमिक विभागात शेकडो पदे

भरली जात असतांना व शेकडो पदे भरतीवरील बंदीमुळे रिक्त असतांना अतिरिक्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माध्यमिक शाळांमध्ये समायोजन करण्याची आवश्यकता, कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्री. जयवंतराव जाधव व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुरोगामी राज्य असा लौकिक असलेल्या राज्यातील पुणे शहर विद्येचे माहेरघर असून याच शहरात थोर कृतीशील समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांनी शिक्षणाची चळवळ सुरु करुन बहुजनांना व स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली, पुणे शहरात शिक्षणाचे महान कार्य करणाऱ्या समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव पुणे विद्यापीठाला देऊन त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात होत असलेली मागणी, आद्यप्रवर्तक महात्मा ज्योतिराव फुले यांचे नाव विद्यापीठाला देणे तसेच पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १८ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.